# समिती दर्पण

**मे २०२५**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात १२०० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# आत्मविश्वासाने आकाशी झेपावण्याचे मिळाले बळ

## पदवीचे शिक्षण पूर्ण करून समितीतून बाहेर पडणाऱ्या मुलामुलींची भावना

**खेडेगावातून पुण्यासारख्या महानगरात आल्यानंतर मन सैरभैर झाले. पण समितीत विश्वस्त, कार्यकर्ते, पर्यवेक्षकांकडून मिळालेले प्रेम, जिव्हाळा, वडिलधाऱ्यांच्या भूमिकेतून त्यांनी लावलेली शिस्त, मार्गदर्शन यामुळे पुन्हा एका नव्या कुटुंबात आल्यासारखे वाटले. जिवाभावाचे मित्रमैत्रिणी मिळाले. विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमांमुळे झालेला सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास, समितीतील दिनक्रमामुळे लागलेली शिस्त, झालेले संस्कार या शिदोरीच्या बळावर आता नव्या जगात आत्मविश्वासाने प्रवेश करू, अशी भावना पदवीचे शिक्षण पूर्ण करून समिती वसतिगृहातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.**



विद्यार्थी प्रमुख म्हणून काम करताना माझ्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. समिती ही संस्था केवळ वसतिगृह नसून , विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारे एक प्रेरणास्थान आहे. इथे नेतृत्वगुण, वेळेचे व्यवस्थापन, आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणीव या सर्व गोष्टी शिकायला मिळाल्या. समितीने मला सामाजिक जाणीवेचा आणि सहकार्याचा खरा अर्थ शिकवला. अपारंपरिक मार्गांनी विद्यार्थ्यांना मदत करणारी ही संस्था म्हणजे दुसरे घरच वाटते.

**- दिव्या धानंजय कुलकर्णी,** नवीन वसतिगृह A विंग



विद्यार्थी प्रमुख म्हणून विद्यार्थी व्यवस्थापनात काम करीत होते. या काळात अनेक गोष्टी शिकले. समितीने मला व्यक्तिमत्त्व विकास, संवाद कौशल्य, संघटन कौशल्य आणि निर्णय क्षमता यामध्ये खूप प्रगती करण्याची संधी दिली. येथे राहून मला जबाबदारी, नेतृत्व आणि सहकार्य याचे खरे महत्त्व समजले. समितीने माझ्यातील आत्मविश्वास वाढवला. अडचणींवर मात करायला शिकविले. ही संस्था माझ्यासाठी एक कुटुंब आहे.

**- ज्ञानेश्वरी सुरेश थोरवे,** नवीन वसतिगृह, A विंग



समितीतला माझा प्रवास हा जीवनशिक्षणाचा अमूल्य टप्पा ठरला. येथे स्वश्रम', वाचनालय, योग, 'कमवा- शिका' यांसारख्या उपक्रमांनी शिस्त, स्वावलंबन आणि श्रमप्रतिष्ठेची खरी जाणीव करून दिली. इथे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर एकत्र राहून शिकण्याची, समजूतदार होण्याची आणि जबाबदारीने जगण्याची शिकवण मिळाली. समितीने दिलेली मूल्यशिक्षणाची शिदोरी आयुष्यभर उपयोगी पडेल.

**- तुषार मोहन महाजन,** पी. डी. कारखानीस वसतिगृह




विद्यार्थी सहाय्यक समिती म्हणजे विद्यार्थांसाठी आधारवड आणि माझ्या जीवनाला गती देणारे ठिकाण आहे. समितीमुळे माझा सर्वांगीण विकास झाला. समितीच्या संगणक विभागाचे काम पाहताना मला शैक्षिणक जीवनात खूप फायदा झाला. समितीच्या नियमांचा वापर करून मी माझे जीवन उत्तम बनविण्याचा प्रयत्न करीत आहे.

**- प्रगती दत्तात्रय वायकुळे,** मुलींचे नवीन वसतिगृह



समितीमध्ये राहण्याचा अनुभव अत्यंत समृद्ध ठरला. नेतृत्वगुण, वेळेचे व्यवस्थापन, संघभावना आणि संवादकौशल्य यांसारखी व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करता आली. विविध उपक्रमांचे आयोजन करताना जबाबदारीची जाणीव झाली व निर्णयक्षमतेत वाढ झाली. समाजसेवेची प्रेरणा मिळाली. वरिष्ठांचे मार्गदर्शन व पाठिंबा आम्हाला सदैव प्रोत्साहन देणारा ठरला.

**- सायली लोहकरे,** मुलींचे नवीन वसतिगृह



पुण्यात आल्यानंतर समोर अनेक प्रश्न होते, पण वेळोवेळी कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे हा प्रवास सोपा झाला. समितीच्या देणगीदार उमा ढवळे यांच्या रुपाने अनोळखी शहरात स्वतःच्या मुलीप्रमाणे जीव लावणारी आई भेटली. मी समितीच्या सुरक्षित वातावरणात राहत असल्यामुळे आईवडील घरी निवांत झोपू शकले. आशा आहे, की एक दिवस आपणही इथे येऊन खेड्यातून आलेल्या आपल्या भावंडांना मदत करू.

**- ऋतुजा आहेर,** नवीन वसतिगृह, B wing



समिती ही विचाराला प्रवृत्त करणारी संस्कारशाळा आहे. मी येथे स्वावलंबन, सेवाभाव, श्रमप्रतिष्ठा यांचे मोल शिकलो. 'कमवा- शिका', योगा, वाचनालय, स्वश्रम असे उपक्रम म्हणजे आमच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे आधारस्तंभ होते. कार्यकर्त्यांचा समर्पित भाव आणि समाजासाठी काही करण्याची प्रेरणा ही समितीची खरी ताकद आहे.

**- हर्षल संजय पाटील,** पी. डी. कारखानीस वसतिगृह



योग वर्गांमुळे निरोगी आयुष्य मिळाले, 'कमवा आणि शिका'मुळे स्वावलंबनाची जाणीव झाली, 'पाल्य-पालक' योजनेतून मार्गदर्शन आणि संवाद साधता आला. दररोज अर्धा तास काम करून स्वच्छतेचे आणि श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व शिकायला मिळाले. विद्यार्थिनी प्रमुख म्हणून काम करताना आत्मविश्वास आणि संवाद कौशल्य प्राप्त झाले. भविष्यात जे काही साध्य करेन, त्यामध्ये समितीने आमच्यावर केलेल्या संस्कारांचा अमूल्य वाटा असेल.

**- स्वामिनी कुलकर्णी,** सुमित्रा सदन



This hostel has been more than just a place to stay — it shaped my personality, discipline, communication, and management skills. Being a part of Tejaswini Project by Bharat Forge further enhanced my technical and professional growth. Today, as I step into the corporate world with placement at AVAADA Group, I carry the values learned here with pride.

**- Shruti Rajaram Khaire,** Dr. Apte Hostel



समितीत गेल्या तीन वर्षांत मला शिस्त, नियोजन, नेतृत्व व कार्यक्षमतेचे अमूल्य धडे मिळाले. विविध उपक्रमांतून मिळालेले ज्ञान आणि उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून मिळालेला आत्मविश्वास यामुळे स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची क्षमता माझ्यात निर्माण झाली. कमवा- शिका प्रमुख म्हणून पार पाडलेली जबाबदारी आणि त्यातून मिळालेला अनुभव निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

**- साक्षी सुर्वे,** सुमित्रा सदन



समितीतील दोन वर्षांचा अनुभव अत्यंत समृद्ध करणारा ठरला. विविध उपक्रमांमुळे माझ्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडले. शिक्षणाबरोबरच श्रमाचे महत्त्व, जबाबदारीची जाणीव आणि शिस्त यांची शिकवण मिळाली. पालकत्त्व योजनेमुळे पुण्यात एक भावनिक नाते निर्माण झाले. दररोज योगाभ्यासामुळे मानसिक व शारीरिक तंदुरुस्ती साधता आली, तर श्रमकार्यामुळे स्वावलंबन आणि संघभावनेचा विकास झाला.

**- सोहम देशमुख,** लजपत वसतिगृह



माझ्या आयुष्यात समितीचे योगदान अमूल्य आहे. आर्थिक अडचणींच्या काळात केवळ निवासच नाही, तर आत्मविश्वास, शिस्त, आणि सेवाभाव यांचे संस्कार मला मिळाले. समितीतील कार्यसंस्कृती आणि वरिष्ठांचा मार्गदर्शनाचा हात आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर उपयोगी ठरेल. माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांसाठी ही संस्था एक संजीवनी ठरली आहे.

**- शुभम राजेंद्र गोरे,** लजपत वसतिगृह



समितीत मिळालेली शिस्त, मार्गदर्शनामुळे आणि व्यवस्थापनाच्या अनुभवामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वामध्ये खूप सकारात्मक बदल झाले. वेळेचे महत्व, सामूहिक जीवनातील समजूतदारपणा, स्वयंपूर्णता आणि सामाजिक जबाबदारी यांचा अनुभव मिळाला. 'तेजस्विनी प्रकल्प – भारत फोर्ज' या उपक्रमामुळे माझ्या कौशल्यामध्ये वाढ झाली. आत्मविश्वास आणि व्यावसायिक दृष्टिकोन यामध्ये खूप प्रगती झाली आहे.

**– प्रगती अनिल जाधव,** डॉ. आपटे वसतिगृह



समितीत स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर माझी शैक्षणिक जडणघडण झाली. चार तास काम, योगासन, पाल्य पालक योजना, विद्यार्थी विकास केंद्र, उद्योजकता विकास केंद्र आणि समितीचे विद्यार्थी व्यवस्थापन याचबरोबर कार्यकर्ते, माजी विद्यार्थी आणि वेगवेगळ्या क्षेत्रांतील पाहुण्यांच्या मार्गदर्शनामुळे माझ्यामध्ये चांगला बदल होत गेला. त्यामुळेच माझी बांधकाम क्षेत्रामधील नामवंत कंपनीमध्ये निवड झाली.

**- सूरज सुरेखा प्रल्हाद पाटील,** लजपत वसतिगृह

पान २ वर ▶

# मुलींच्या नवीन वसतिगृहात फिशर मेजरमेंटकडून २ खोल्या

## अहिल्यानगरच्या मुलांच्या होस्टेलला संगणक कक्षासाठी देणगी

फिशर मेजरमेंट टेक्नॉलॉजीज (इंडिया) प्रा. लि. या कंपनीने पुण्यातील मुलींच्या नवीन वसतिगृहातील दोन खोल्यांसाठी आणि अहिल्यानगर येथील मुलांच्या वसतिगृहातील संगणक कक्षासाठी सीएसआर अंतर्गत देणगी दिली. २१ मे रोजी कंपनीचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट हेड डॉ. ख्रिस्तीयन वुटके आणि हेड ऑफ प्रॉडक्ट मॅनेजमेंट होल्गर श्मिड यांच्या हस्ते पुण्यातील दोन खोल्यांचे उद्‌घाटन झाले. यावेळी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर राकेश भान, जनरल मॅनेजर भरत पाटील, समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, सीएसआर प्रमुख प्रदीप मांडके, विश्वस्त, कार्यकर्ते, कर्मचारी उपस्थित होते.

'समितीचे काम पाहून आम्ही प्रभावित झालो. ही तरुण पिढी स्वतः सहभागातून घडते आहे, हे पाहून खूप आनंद झाला. संस्थेबरोबर विविध उपक्रम व आर्थिक मदत या माध्यमातून जोडलेले राहायला आवडेल,' असे यावेळी दोन्ही पाहुण्यांनी सांगितले.

'ग्रामीण विद्यार्थ्यांना आणि त्यातही मुलींना शिक्षणासाठी संधी देण्याचा समितीचा प्रयत्न आहे. आपल्यासारखे चांगले लोक संस्थेशी जोडले जात असल्यामुळे आता विद्यार्थ्यांना परदेशातही संधी मिळत आहेत,' असे प्रतापराव पवार यांनी सांगितले. प्रदीप मांडके यांनी प्रास्ताविक केले आणि पाहुण्यांची ओळख करून दिली.







# नावाप्रमाणे निर्मळ व्यक्तिमत्त्व

## तयाचा वेलू...



मौजे पिपरी निर्मळ (ता. राहाता, जि. अहिल्यानगर) हे मूळ गाव असलेले उत्तमराव निर्मळ. प्राथमिक शिक्षण गावातच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत, अकरावी-बारावी पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयातून केले आणि त्यानंतर पुण्याच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. (सिव्हिल) पदवी घेतली.

उत्तमराव आठवीत असताना त्यांच्या गावातील एक गृहस्थ सिव्हिल इंजिनीयर म्हणून कार्यरत होते. संध्याकाळी ते ऑफिसमधून घरी यायचे तेव्हा त्यांचे शिपाई त्यांच्या डोक्यावर छत्री धरून सामान घेऊन मागेमागे जायचे. उत्तमरावांना त्या थाटाचे इतके आकर्षण वाटले, की तेव्हाच त्यांनी इंजिनीयर होण्याचा ध्यास घेतला आणि ते स्वप्न पूर्ण केले. पुढे एमपीएससी उत्तीर्ण होऊन शासकीय सेवेत, पाटबंधारे खात्यात रुजू झाले.

उत्तमरावांच्या स्वप्नाच्या पूर्ततेत साथ मिळाली ती समितीची. समितीविषयी बोलायचे आहे म्हटल्यावर त्यांनी लिहूनच पाठवले. ते इतके हृद्य आहे, की ते त्यांच्याच शब्दात दिले पाहिजे. ते म्हणतात, "विद्यार्थी साहाय्यक समिती हे निरंतर चालू असलेले संस्कार केंद्र आहे, निस्वार्थ सेवा आहे, अखंड चालू असलेला सेवायज्ञ आहे. व्यवहार नाही तर आत्मीयता आहे. हृदयस्थ संवाद आहे. हाकेला `ओ` आहे. येथे नवीन नात्यांचा जन्म होतो. आयुष्यभरासाठी अक्षय शिदोरी मिळते. साथ देणारे जिवाभावाचे सवंगडी भेटतात. येथे कौटुंबिक ओलाव्याचा सुखद आणि आश्वासक स्पर्श आहे. अडीअडचणी समजून घेणारी आपली माणसे आहेत. आपले गाव सोडून दूरच्या शहरात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांच्या पंखात समिती बळ भरते. ज्या होतकरु आणि गरजू विद्यार्थ्यांना समितीने आधार दिला तेच पुढे जाऊन समितीला आधार देणारे आधारस्तंभ झाले आहेत!!"

"ग्रामीण भागातील सर्वसाधारण शेतकरी कुटुंबातील मी, पहिल्यांदाच पुण्यासारख्या अनोळखी ठिकाणी आलो होतो. एक अनामिक हुरहूर आणि अस्वस्थता वाटत होती. निवास आणि जेवणाच्या खर्चाचा प्रश्न होता. त्याचा अभ्यासावर परीणाम होत होता. अशा परिस्थितीत कोणीतरी समितीबद्दल सांगितले. मी सायकलवरून चौकशी करीत फर्ग्युसन रोडवरील समितीच्या कार्यालयात आलो. आदरणीय राजाभाऊ पटवर्धन सर आणि यादवराव कुलकर्णी सरांची भेट झाली. त्यांनी माझी जुजबी चौकशी केली. आठवड्यातून चार तास काम करावे लागेल आणि कधीही काही अडचण आली तर भेटत राहा, असे सांगितले. त्यांनी माझ्याकडून फॉर्म भरून घेतला. अगदी वाजवी दरात राहण्याची व्यवस्था (४५० रुपये टर्म फी आणि ४५ रुपये महिना मेस) झाल्याने मी जाम खुश झालो. त्यांनी घेतलेली मुलाखत मात्र मी आजही विसरलो नाही. ज्या आपुलकीने, ममतेने, प्रेमळ भावनेने आणि विश्वासात घेऊन माझ्याबरोबर संवाद केला त्याने मला मोठा मानसिक आधार मिळाला."

"अभ्यास करा, अवांतर वाचन करा, स्वच्छ राहा, व्यायाम करा, चांगले राहा, एकमेकांना मदत करा, सुरक्षित राहा, अन्नाची नासाडी करु नका, सामूहिक कार्यक्रमात भाग घ्या, शिस्त पाळा, मदत करणाऱ्यांचा सन्मान ठेवा, सुसंवाद साधा", असा आपुलकीचा उपदेश करणारे आदरणीय रमाकांत तांबोळी सर दिवसरात्र आमच्या व्हरांड्यात ये-जा करत असत. त्यांनी आमच्या वडिलांची जागा कधी घेतली, हे आम्हाला कळले सुद्धा नाही. त्यांचा तो अक्षय उत्साह, अथक परिश्रम आणि त्यांचा तो आश्वासक आवाज पन्नास वर्षांनंतर आजही कानी घुमतो." "समितीत राहून फक्त शिकलो असे नाही, तर घडलो. समिती सोडल्यानंतर आणि आयुष्याचा पुढचा प्रवास सुरू केल्यानंतरही, वेळोवेळी समितीची आठवण जागृत होते. समितीच्या माध्यमातून अनेकांशी नाळ जोडली गेली आहे. समितीयन हा एकमेकांना गुंफणारा मृदू मुलायम धागा आहे... समिती विविध उपक्रम, चर्चासत्रे, व्यक्तिमत्व विकास, परिसंवाद, योगा, शिबिरे, मेळावे, बदलती जीवनशैली तसेच विविध आणि बहुउद्देशीय कार्यक्रमांचे आयोजन, सतत आधुनिक होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने करते. जीवन परिपूर्णतेच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे आहे."

"मी एका प्रसंगाचा उल्लेख करू इच्छितो. १९७९ मध्ये तत्कालीन वन राज्यमंत्री (कै.) विनायकराव पाटील समितीच्या डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृहात एका कार्यक्रमानिमित्ताने आले होते. समितीच्या कार्यकर्त्या (कै.) निर्मलाताईंनी पुरंदरे यांनी त्यांचे स्वागत केले. त्या उभयतांचा संवाद त्यावेळी मी ऐकला. विनायकरावांचे स्वागत करताना निर्मलाताई म्हणाल्या, 'पुंडलिका भेटी पांडुरंग आले!!' त्यावर विलंब न लावता विनायकराव पाटील म्हणाले, 'नाही, नाही, पांडुरंगा भेटी पुंडलिक आला. Briefly speaking, " SAMITI" transformed us from LOCAL to GLOBAL and ABLE to NOBLE citizen..."

आपला परिवार, अर्धांगिनीबद्दल ते म्हणतात, "माझी पत्नी सौ. सुनंदा हिने सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या वेळेवर, यशस्वीपणे आणि कार्यक्षमतेने स्वतःवर घेतल्या. तिच्या खंबीर पाठिंब्याशिवाय, प्रोत्साहन आणि प्रेरणेशिवाय, अडचणीचा सामना करीत पुढे जाणे माझ्यासाठी शक्य नव्हते."

जलसंपदा विभागात सरकारी सेवेत रुजू होण्यापूर्वी, ते प्रवरानगर येथे प्रवरा (सध्याचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील) सहकारी साखर कारखान्यात सेवेत होते. पाटबंधारे खात्यात उत्तमरावांनी महाराष्ट्रात विविध ठिकाणी कामे केली. शासकीय सेवेतून निवृत्तीनंतर त्यांनी पाणी क्षेत्रात श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याबरोबर तांत्रिक सल्लागार म्हणून काम केले. जलसंपदा प्रकल्प नियंत्रण, कोकणातील पश्चिमेला अरबी समुद्रात जाणारे पाणी पूर्वेला गोदावरी खोऱ्यात आणणे, समन्यायी पाणी वाटप कायदा आणि त्याविषयीचे संभाजीनगर, मुंबई, दिल्ली येथे चालू असलेल्या जनहित याचिका, सिंचन व्यवस्थापन या संदर्भातील ते कामे पाहतात.

त्यांची एक सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे ते कायम जेथे त्यांचे काम चालू होते, तेथेच कुटुंबासह राहिले. मग ते छोटे गाव का असेना. त्यासाठी त्यांनी त्यांच्या मुलांचे शिक्षणसुद्धा झेडपीच्या शाळेतूनच पूर्ण केले. तरीही मुले कुठेही मागे पडली नाहीत, हे ते अभिमानाने नमूद करतात.

(शब्दांकन- माधवी कुलकर्णी)

# सायंकाळी एके मेळी

## समितीतील कलाकारांचा 'सदाबहार' कट्टा...

समितीतील आम्ही काही कार्यकर्ते बैठक संपवून (वर्गा) बाहेर आलो की, एखादं वाचलेलं छानसं पुस्तक, Old classic cinema, आठवणीतली गाणी, कविता यावर सहज बोलू लागलो आणि त्यातून वाचन कट्ट्याची कल्पना पुढे आली. संजय अमृते, मी आणि एक- दोघांनी पुढाकार घेऊन त्याला आकार दिला. इतर कार्यकर्त्यांनाही यात सहभागी होण्यासाठी बोलावलं. समानधर्मी १०-१२ मंडळी एकत्र आली आणि दर महिन्यात एक वार ठरवून संध्याकाळी जमायला सुरुवात झाली.

उद्घाटनालाच चित्रकार हेमंत राजहंस यांनी जलरंगातील अतिशय सुंदर निसर्ग चित्र रेखाटले. खूप काही येणारे हरहुन्नरी प्रभाकर पाटील यांनी सुमधुर गाणी म्हटली. स्वरचित कविता झाल्या आणि रवींद्र नामजोशी, संजय अमृते यांचं खुसखुशीत प्रहसन झालं. हेमंत राजहंस यांनी पुस्तकाचं कपाट आणलं. आम्ही प्रत्येकी पाच पुस्तके देऊन लायब्ररी सुरू केली. एका विद्यार्थिनीवर कमवा- शिका अंतर्गत त्याची जबाबदारी दिली.

आता वाचनापासून सर्व कलांचा यात सहभाग सुरू झाला आहे. कविता, गाणी, विनोद, रसभरित किस्से, वादन, चित्रकला त्यामुळे नव नाव दिलं 'सदाबहार कट्टा'.

आता सभासदही वाढलेत. मंडळी महिन्याच्या




शेवटच्या मंगळवारी संध्याकाळी पाच वाजता पारावर जमायला लागली आहेत. 'विषयाचं बंधन नाही, घरी जायची घाई नाही' अशी आमची टॅगलाईन आहे. आता कागदावर चित्र काढून रंगवायची आहेत. उत्स्फूर्त पत्र लेखन करायचं आहे. दरवेळेस एक नाविन्य! जोडीला अल्पोपाहारही असतो आणि हो... या 'सदाबहार'चं बहारदार पोस्टर डिझाईन केलंय आमच्या अष्टपैलू ज्योतीताईंनी.

येताय ना शेवटच्या मंगळवारी..? वाट बघतो.

**- सुप्रिया केळवकर**

# आत्मविश्वासाने आकाशी झेपावण्याचे मिळाले बळ

▶ पान १ वरून




My journey at Samiti, has been truly transformative. The hostel's emphasis on discipline, guidance, and management has shaped me into a responsible individual. I've developed essential skills like time management, teamwork. The samiti's values have helped me excel academically and instilled in me a sense of compassion and responsibility.

**- Gitanjali Mhaske,** Dr. Apte Hostel



समितीमध्ये येऊन योगा शिकले. पालकत्व योजनेमुळे नवीन पालक भेटले. महिन्यातून एकदा होणाऱ्या गटचर्चेमुळे आत्मविश्वास वाढला. स्वतःचे मत व्यक्त करायला शिकले. ग्रंथालयाचा उपयोग झाला. समितीचे कार्यकर्ते सतत प्रेरणा देत असतात. वसतिगृह मुलींसाठी सुरक्षित आहे. समितीत स्वच्छता व नीटनेटकेपणा प्रत्येक जण जपतो.

**- मयुरी शेळके,** कै. मधुभाऊ चौधरी मुलांचे वसतिगृह अहिल्यानगर.



वसतिगृहात व्यावहारिक जीवनाचे ज्ञान मिळाल्यामुळे मी अधिक जबाबदार झाले. आत्मविश्वास वाढला. येथे नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळाली. विविध विषयांवर चर्चा करण्याची आणि मैत्रिणींशी संवाद साधण्याची संधी मिळाली. वसतिगृहातील वातावरण अभ्यासासाठी पोषक आहे. येथे सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत.

**- शुभांगी बढे,** कै. मधुभाऊ चौधरी मुलांचे वसतिगृह अहिल्यानगर.



अभियांत्रिकी क्लबचा प्रमुख म्हणून, मी 'प्रद्योतकी : सस्टेनेबिलिटी' या अभियंता दिनाचे आयोजन करण्याची संधी मिळाली. कमवा- शिका योजनेमुळे आर्थिक मदत मिळाली आणि कौशल्ये विकसित केली. समितीच्या सहाय्याने मी Six Sigma कोर्स पूर्ण केला, ज्यामुळे माझी विश्लेषणात्मक आणि प्रक्रियात्मक विचारशक्ती वाढली. इंग्रजी संभाषण वर्ग, गटचर्चा, योगा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे माझ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला.

**- आकाश दुबे,** हरिभाऊ फाटक वसतिगृह



विद्यार्थी विकास केंद्र प्रमुख म्हणून काम करीत असताना केलेल्या कार्यक्रमांमुळे आत्मविश्वास वाढला. जेव्हा मी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्समध्ये इंटर्नशिपसाठी अर्ज केला, तेव्हा हा अनुभव उपयोगी आला. आज मी फिल्डवर लोकांशी संवाद साधतो, एखादा प्रोजेक्ट हाताळतो, वेळेत काम पूर्ण करतो, तेव्हा मला समितीतील प्रत्येक क्षण आठवतो.

**- आदित्य झेंडे,** हरिभाऊ फाटक वसतिगृह

## समिती वृत्त



*हसीता ओझा आणि अशोक तापडिया या अमेरिकास्थित देणगीदारांनी समितीला भेट दिली. ओझा यांनी मुलींच्या नवीन वसतिगृहातील एका खोलीसाठी दहा लाख रुपयांची देणगी दिली. डॉ. मकरंद फडके यांच्या संपर्कातून हे दोघे समितीशी जोडले आहेत. समितीच्या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.*



# तांबोळी सरांच्या स्मृतिदिनी रक्तदान शिबिर

माजी पर्यवेक्षक आणि विश्वस्त रमाकांत तांबोळी यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त माजी विद्यार्थी मंडळातर्फे लजपत संकुलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. ४ मे रोजी घेतलेल्या शिबिरात ३८ बाटल्या रक्त संकलित झाले.

यावेळी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, माजी विद्यार्थी डॉ. नाना कुंजीर, त्यांच्या पत्नी सौ. सुषमा, मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळा

दरवर्षीप्रमाणे यंदाही समितीच्या कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळा ३ मे रोजी लजपत संकुलातील पुसाळकर हॉलमध्ये आयोजित केली होती. या कार्यशाळेला ३६ कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यशाळेत समितीची स्थापना व व्यवस्थापन रचना याविषयी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी माहिती दिली. सद्यस्थिती आणि आगामी योजनांविषयी खजिनदार संजय अमृते यांनी सांगितले. आर्थिक नियोजन आणि कार्यकर्त्यांकडून अपेक्षित आर्थिक शिस्त याबाबत कार्यकर्ते रवींद्र नामजोशी यांनी मार्गदर्शन केले. प्रवेश प्रक्रिया, आर्थिक मदत आणि कार्यकर्त्यांची जबाबदारी याविषयी विश्वस्त रत्नाकर मते यांनी, तर समितीचे धोरण, उपक्रम, कार्यकर्त्यांची भूमिका याविषयी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी मांडणी केली. कार्यकर्ता मंडळाच्या बैठका, कामकाज याबाबत स्नेहा फडके यांनी माहिती दिली. कार्यशाळेचे सूत्रसंचालन नंदकुमार तळेकर यांनी केले.

# समिती अंतर्गत स्वयंसेवी संघटना

समितीने कंपनी कायद्याच्या सेक्शन ८ अंतर्गत आणखी एका स्वयंसेवी संस्थेची (NGO) स्थापना केली आहे. Students Welfare Association असे या स्वयंसेवी संस्थेचे नाव असून त्या अंतर्गत सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कौशल्य विकास, परदेशी भाषा शिक्षण, संगणक अभ्यासक्रम, नर्सिंग, पॅरामेडिकल अशा उपक्रमांचा त्यात समावेश असेल.

# प्रमाणपत्र '१० बीई'चे देणगीदारांना वितरण

देणगीदारांच्या देणग्यांची संपूर्ण माहिती प्राप्तिकर खात्याकडे पाठविणे अनिवार्य असते. प्राप्तिकर खात्याकडून त्याची १० बीई प्रमाणपत्र तयार करून संस्थेकडे येतात. अशी यावर्षीची प्रमाणपत्रे सर्व देणगीदारांना मेल, व्हॉट्सअपद्वारे पाठविण्यात आलेली आहेत. कोणाला प्रमाणपत्र मिळाले नसेल तर संस्थेच्या कार्यालयात ९४०४८ ५५५३० या क्रमांकावर संपर्क साधावा.